navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 03 May, 2025

## Total Mention 5

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 2 | N/A | N/A | 2 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 3 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Mumbai Tarun Bharat | Will the 'Dharavi Bachao Movement' be called off | Mumbai | 3 |
| 2. | Pudhari | Biggest crisis on Dharavikars in the name of redevelopment: Baburao Mane | Mumbai | 3 |

Mumbai Tarun Bharat • 03 May • Dharavi

## Will the 'Dharavi Bachao Movement' be called off

| 3 • PG | 62 • Sqcm | 7725 • AVE | 17.73K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# 'धारावी बचाव आंदोलन' गुंडाळले जाणार?

### महाराष्ट्र दिनी आयोजित सभेकडे प्रमुख नेत्यांचीच पाठ

**मुंबई, दि. २ : विशेष प्रतिनिधी**

दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत मोठ्या संख्येने समर्थकांसह 'धारावी बचाव समिती'ने धारावीत सभेचे आयोजन केले होते. परंतु, ही सभा अयशस्वी झाल्याचे दिसून आले. 'धारावी बाचवा समिती'चे समन्वयक राजू कोरडे हे स्वतः बैठकीला उपस्थित होते. पण त्यांनी कोणतेही भाषण दिले नाही. यापूर्वी, कोरडे यांनी घोषणा केली होती की, दि १ मे रोजीच्या बैठकीत ते 'मास्टर प्लॅन'ची घोषणा करतील. त्यामुळे 'मास्टर प्लॅन'च्या अपेक्षेने जमलेल्या धारावीकरांची सपशेल निराशा झाली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राजू कोरडे यांनी सभेला संबोधित करण्याऐवजी त्यांची मुलगी सौम्या यांना भाषणाची संधी देण्यात आली. सौम्या कोरडे यांना मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी चेहरा म्हणून पुढे आणण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यासोबतच, धारावीतील स्थानिक खासदार आणि आमदार असणाऱ्या गायकवाड भगिनीदेखील या बैठकीपासून दूर राहिल्या. बैठकीच्या शेवटच्या टप्प्यात ज्योती गायकवाड यांनी केवळ फोटोसेशन करण्यापुरती उपस्थित दर्शविली. केवळ काही घोषणाबाजी करून निघून गेल्या.

### केवळ ४०० लोकांची उपस्थिती

सभेचे सर्वात मोठे अपयश म्हणजे या सभेसाठी साधारण केवळ ४०० लोकांची उपस्थिती होती. यावरून हे स्पष्ट होते आहे की, धारावी बचाव आंदोलनाला नवीन घरात जाऊ इच्छिणाऱ्या सामान्य नागरिकांकडून समर्थन नाही. याबद्दल अधिक बोलायचे झाले तर, धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे अंतिम टप्प्यात असणारे सर्वेक्षण हे एक मोठे यश आहे. सर्वेक्षणाचे ८० टक्केपेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. एक लाखाहून अधिक स्ट्रक्चरर्स आणि ७५ हजार स्ट्रक्चरर्सचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तसेच, आजच्या कार्यक्रमातून असे दिसते की धारावी पुनर्विकासाला अधिक गती मिळेल.

या सभेची पूर्वकल्पना असूनही, अनिल देसाई आणि आ. महेश सावंत हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे वरिष्ठ नेते उपस्थित नव्हते. माजी आमदार तथा शिवसेना उबाठा गटाचे नेते बाबुराव माने यांनी मात्र धारावीकरांना उद्भवणाऱ्या समस्येचे गांभीर्य समजत नाही, असेच म्हणावे लागेल. कारण त्यांनी यावेळी उपस्थितांना धारावीच्या बाहेर फेकून दिले जाईल, असे म्हणत धारावीकरांची दिशाभूल केली.

The May 7 meeting for the Dharavi rescue movement lacked support, with only three attendees and no major announcements. Raju Korade, who had promised a 'Master Plan,' did not speak, and his daughter Soumya took the stage. Meanwhile, the Dharavi redevelopment project survey is in its final phase, gaining momentum.

Pudhari • 03 May • Dharavi

## Biggest crisis on Dharavikars in the name of redevelopment: Baburao Mane

| 3 • PG | 122 • Sqcm | 110115 • AVE | 347.1K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai



# पुनर्विकासाच्या नावाने धारावीकरांवर सर्वांत मोठे संकट : बाबुराव माने

धारावी : पुढारी वृत्तसेवा

धारावीकरांनो, धारावीतच घर मिळेल या संभ्रमात राहू नका. माटुंगा परिसरात ज्या रेल्वेच्या जमीनीवर अदानीच्या पुनर्विकासाचे काम सुरु आहे, ते रेल्वे पटऱ्यांलगत राहणाऱ्या रहिवाशांसाठी आहे. जर त्यातून काही सदनिका रिकाम्या राहिल्या, तर त्या इमारतींमध्ये काही कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. ६०० एकरमध्ये पसरलेल्या धारावीकरांचे पुनर्वसन अवघ्या ४० एकरमध्ये करण्याचा डाव अदानी समूह आणि एनएमडीपीएलचा आहे. पुनर्विकासाच्या नावावर धारावीकरांवर सर्वात मोठे संकट आले आहे, असे प्रतिपादन 'धारावी बचाव'चे समन्वयक बाबुराव माने यांनी गुरुवारी रात्री धारावीत झालेल्या जाहीर सभेत केले.

ते म्हणाले, धारावीकरांना हुसकावून लावण्यासाठी १५ हजार पोलीस, शेकडो बुलडोजर सज्ज आहेत. लक्षात ठेवा, गेल्या काही महिन्यांपासून सर्वेक्षण सुरु आहे. एकाही धारावीकरला त्यांनी धारावीत घर देणार असे लिखित दिलेले नाही. याउलट नोटरी करणारे काही वकील धारावीत बसवले आहेत. धारावीकरांना बाहेर पाठवण्याचे हे षडयंत्र आहे. १ लाख झोपडीधारकांना अपात्र ठरवून बाहेर फेकणार आहेत. मग इथे पुनर्वसन कोणाचे होणार आहे? धारावीकारांच्या पुनर्वसनासाठी रास्ता रोको, रेल रोको आंदोलन करू. यावेळी आमदार महेश सावंत, धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक राजू कोरडे, उल्लेश गजाकोष यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

Dharavikar's redevelopment has sparked a crisis, as Baburao Mane, coordinator of 'Dharavi Rescue,' highlighted in a public meeting. He criticized the lack of clear rehabilitation plans for the 3,000 huts at risk of eviction, accusing authorities of conspiring to remove them. Protests like Rasta Roko and Rail Roko are planned to demand proper rehabilitation.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | The Times of India | Kanjur waste-to-energy plant on hold after HC order | 64.4M |
| 2. | Loksatta - Marathi Newspaper | मुंबईसमोर कचरा विल्हेवाटीचा प्रश्न; ९० टक्के कचरा कांजूरमार्गमध्ये, प्रक्रियेसाठ... | 33.4M |
| 3. | Hotlinenews | ધારાવી બચાવો આંદોલનમાં ભંગાણ, નેતાઓના મતભેદ છતા થયા | N/A |